**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुरेश रामचंद्र पाटील
७३२, दक्षिण कसबा,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा व मुख्याध्यापिका,**
शांती निकेतन हायस्कूल, संजय नगर,
कुमठा नाका, सोलापूर

२) **जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वेतन,**
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८/०१/२००८, ३१/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०९/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९४ ते २००७ या कालावधीतील वेतन पत्रकाच्या प्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०९/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. सुरेश

रामचंद्र पाटील व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, शांती निकेतन हायस्कूल, संजय नगर, व जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (वेतन), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्यास त्याच्या मागणी प्रमाणे माहिती देण्यात आली आहे. तथापि माहितीसाठी रु. ६०००/- एवढया रकमेची आकारणी केली असल्यामुळे अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील केले आहे. अपीलकर्त्याने सन १९९४ ते २००७ या कालावधीतील सर्व वेतन पत्रकाच्या छायाप्रती देण्याची मागणी केली होती वेतन पत्रकाच्या व दिलेल्या माहितीच्या कागदांचा आकार पाहता आकारणी करण्यात आलेली रक्कम योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अनंत विठ्ठल तरकसबंद
घर नं.२१८४, कुवठेकर गल्ली,
पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासक,**
महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल,
साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका,
चिंचपोकळी, मुंबई-११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल,
साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका,
चिंचपोकळी, मुंबई-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३/०९/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०/१०/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे दाखल झालेल्या दहा तक्रारींच्या अनुषंगाने दिलेली निकालपत्रे व सविस्तर माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. श्री.अनंत विठ्ठल तरकसबंद यांच्या माहिती - मागणी अर्जास विहित मुदतीत उत्तर दिले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे प्राप्त होणा-या डॉक्टरांच्याविरुध्दच्या तक्रारी या वैयक्तिक स्वरुपाच्या असल्यामुळे इतरांच्या तक्रारींच्या प्रती व त्यांनी सादर केले पुरावे आणि परिषदेने दिलेले निकाल इ. अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यास त्यावर तक्रारदार आक्षेप घेऊ शकतात, हे जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल परिषद यांनी दिलेले उत्तर योग्य असून ते कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठ्ठल कृष्णात बिराजदार
मु.पो.बाळे, ता.उत्तर सोलापूर
जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५०/सोलापूर |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७/११/२००८ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** विभागीय चौकशी चालू असताना तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या तसेच तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करताना वरिष्ठांची [illegible]नी घेतली होती किंवा कसे, याबाबतचा खुलासा | |

विवेचन

अपीलकर्ता श्री. विठ्ठल कृष्णात बिराजदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. सदर कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत त्यांना आयोगाच्या दि.१०/०२/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि त्यांनी अद्यापपर्यंत वरीलप्रमाणे कागदपत्रे आयोगास सादर केलली नाहीत.

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' [illegible] अपिलाचा [illegible] करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास श्री. बिराजदार अनुपस्थित होते. 'अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती मागितली होती. त्यानुसार दि.९/०९/२००८ रोजी माहिती तयार ठेवूनही श्री.बिराजदार यांनी विलंबाने म्हणजेच दि.२५/०९/२००८ रोजी कार्यालयात येऊन माहिती घेतली. त्यावेळी अपीलकर्त्यांकडून माहितीसाठीचे रु.१६/- शुल्क आकारण्यात आले. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सहानभुती [illegible] आदेश दिले. त्यानुसार रु.१६/- [illegible] आले आहेत', असे जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, [illegible] सुरेश अवसेकर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली वरील [illegible] घेता आयोगाचे आदेश पुढी [illegible]

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.

दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नितीन वसंत जाधव
राधाकृष्ण नगर, मु.पो.कुर्डुवाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
कुर्डुवाडी नगरपरिषद,
ता.माढा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**२) जन माहिती अधिकारी (कर विभाग),**
कुर्डुवाडी नगरपरिषद,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६/०९/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कुर्डुवाडी नगरपरिषदेच्या वार्ड क्र.४ मधील नळ कनेक्शन नं.५४६ च्या धारकाबाबतची माहिती तसेच सदर वार्डातील घर नं.४६० या मालमत्तेसंदर्भातील माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, कुर्डुवाडी नगरपरिषद, कुर्डुवाडी, व जन माहिती अधिकारी (कर विभाग), कुर्डुवाडी

नगरपरिषद, कुर्डुवाडी हे गैरहजर होते. अपीलकर्ता श्री. नितीन वसंत जाधव यांनी दोन माहिती -मागणी अर्जांसाठी आयोगाकडे एकत्रित अपील केले आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. मात्र उपलब्ध नसल्याचे नमूद केलेल्या कागदपत्रांच्या संदर्भात अभिलेख वर्गीकरणानुसार जतनाच्या कालावधीबाबत स्पष्टीकरण करुन आवश्यक ती कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तमराव विठ्ठल भोंडवे
मु.पो.लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उत्तमराव विठ्ठल भोंडवे
मु.पो.लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे प्रतिनिधी श्रीमती सीमा होळकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती सीमा होळकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.७.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.८.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२१.९.२००६ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

सन २००१ च्या शासन निर्णयानुसार ७, ७ब व ७/१२ यातील एका नकलेला पाच रूपये शुल्क आकारण्याची तरतूद आहे. आपण १६ वर्षाच्या पिकपहाणीच्या नोंदीची प्रत मागितली असता, प्रत्येक वर्षाला पाच रूपये प्रमाणे एका कागदाच्या प्रतीला ८० रूपये आकारण्यात आले. तसेच कागदाचे वीस पैसे अगावू घेतले. वस्तुतः प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र कागद वापरलेला नसल्यामुळे एकाच नकलेचे शुल्क आकारले गेले पाहिजे. तसे न करता प्रत्येक वर्षाला पाच रूपये अशी चुकीची आकारणी करून शेतकऱ्यांना भुर्दंड केला जात आहे, म्हणून या संदर्भातील नियम नेमके स्पष्ट होणे आवश्यक असून तशी माहिती दिली जात नाही.

शासन निर्णयानुसार सर्व तालुक्यामध्ये याप्रमाणेच शुल्क आकारणी केली जाते. त्यात बदल करण्याचा अधिकार तालुका पातळीवर नाही. तथापि अपीलकर्त्याची मागणी लक्षात घेऊन शासनाकडून मार्गदर्शन घेऊन स्पष्टीकरणात्मक माहिती त्यांना देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती सीमा होळकर यांनी केले.

प्रत्यक्षात बाजारात छायांकित प्रतीसाठी कमी शुल्क आकारले जाते. त्याप्रमाणे या उताऱ्यांच्या नकलेसाठी शुल्क का आकारले जात नाही या अपीलकर्त्याच्या आक्षेपाची दखल घेता येणार नाही. शासनाने पूर्वी नकलेसाठी ठरविलेले शुल्क आकारण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ विषयक नियमामध्ये शासनाने अनुमती दिलेली आहे.

अपीलकर्ता श्री.उत्तमराव विठ्ठल भोंडवे यांनी उपस्थित केलेला मुद्दा सार्वजनिक हिताचा व शेतकऱ्यांशी संबंधित असा असून महत्त्वाचा आहे. आकारले जाणारे शुल्क प्रत्येक वर्षाला रूपये पाच, की प्रत्येक प्रतीला रूपये पाच, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्षात शुल्क आकारणी केल्यानंतर कागदाच्या खर्चापोटी स्वतंत्र रक्कम घेणेही योग्य नाही. याबाबत शासनाकडून व्यापक जनहितार्थ स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) ७/१२ च्या संपूर्ण एकत्रित नमुन्यातील प्रमाणित प्रतीला आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत प्रतीछायांकित प्रत शुल्क आहे, की प्रतिवर्ष शुल्क आकारणी करावयाची आहे, याबाबतचे स्पष्टीकरण शासनाकडून प्राप्त करून घेऊन दि.३०.४.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास द्यावे.

(३) उपरोक्त क्र.२ मधील स्पष्टीकरणाच्या प्रती व्यापक जनहितासाठी सर्व संबंधित कार्यालयांना पाठविण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल दि.५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कुमार जोतीराम सोनावले
सातारा तालुका कास्ट्राईब शिखक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना,
एफ-२, कार्तिकराज अपार्टमेंट, पुष्कर मंगल कार्यालयामागे,
विसावा नाका, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८१ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कुमार जोतीराम सोनावले
सातारा तालुका कास्ट्राईब शिखक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना,
एफ-२, कार्तिकराज अपार्टमेंट, पुष्कर मंगल कार्यालयामागे,
विसावा नाका, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.उदयसिंह भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.६.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्रीपतराव पाटील हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, करंजे पेठ, सातारा येथील शिक्षकांच्या सेवाज्येष्ठता यादीच्या प्रती आपण मागितल्या होत्या. त्या मिळाल्या नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. शाळेच्या मुख्याध्यापकांकडे माहिती मागितली नव्हती. त्यांनी माहिती दिली, परंतु संदिग्ध आहे. उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, त्यांनी ती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.कुमार जोतीराम सोनावले यांनी केले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्या सहीशिक्क्याने दि.१.८.१९९१ ची शिक्षक सेवाज्येष्ठता यादीची प्रत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली.

श्री.सोनवले यांचा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी शाळेकडे त्याच दिवशी वर्ग केला व माहिती देण्याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकांना कळविले. त्यांनी यापूर्वीच ही माहिती अपीलकर्त्यास दिली असल्याचे त्यांना व आपल्याला कळविले. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार पुन्हा रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. सेवाज्येष्ठता याद्या शिक्षणाधिकारी कार्यालयात जमा केल्या जात नाहीत. तसेच प्रस्तावाबाबतची जुनी कागदपत्रे नाश केली असल्यास देता येणार नाहीत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा श्री.उदयसिंह भोसले यांनी केले.

अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती पूर्वीच हस्तपोच देण्यात आली असल्याचे श्रीपतराव पाटील हायस्कूलच्या मुख्याध्यापकांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. माहिती देण्याबाबत

अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसारही त्यांनी कार्यवाही केली आहे. विशिष्ट अधिकाऱ्याच्याच सहीशिक्क्याने माहिती दिली पाहिजे, असा आग्रह माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये धरता येणार नाही. अपीलकर्त्याने मागितलेल्या प्रस्तावासोबतच्या सेवाज्येष्ठता यादी आदी कागदपत्रांच्या प्रतीचा शोध घेऊन त्याबाबत अपीलकर्त्यास एका आठवड्यात कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा यांनी दि.३०.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संभाजी सिद्राम मस्के
घर नं.३७, राजीव गांधी नगर, भवानी पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक,**
बी.एस.कुलकर्णी प्रशाला, उत्तर कसबा,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८५/सोलापूर + १२९१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६/०८/२००८, ४/०६/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०/०८/२००८, ----- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/१०/२००८, २५/०७/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** १) बी.एस.कुलकर्णी प्रशाला, उत्तर कसबा, सोलापूरच्या व्यवस्थापन मंडळावरील पदाधिका-यांचा तपशील, अनुदानित तुकडया, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवक संच, तदनुषिंग ८ मुद्दे २) प्रशालेतील इयत्ता ५वी ते १०वी मधील मागासवर्गीय मुलींना मिळणारी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, अपंगशिष्यवृत्ती, अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती व विडी कामगार शिष्यवृत्ती इ. बाबतची माहिती तसेच शाळेचे बँक अकौंट स्टेटमेंट, रोस्टर, स्टाफ अप्रुव्हल, अनुषंगिक ६ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संभाजी सिद्राम मस्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत ते दारिद्रयरेषेखालील असलेबाबत नमूद केले असून पुरावा म्हणून शिधापत्रिकेची छायांकित प्रत सादर केली आहे. या सदंर्भात श्री. मस्के हे दारिद्रयरेषेखालील आहेत अथवा कसे, याबाबत शहानिशा करुन अहवाल सादर करण्याबाबत आयोगाने दि.१५/१२/२००८ च्या पत्रान्वये निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांना निर्देशीत केले. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी याबाबत अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये श्री.संभाजी सिद्राम मस्के यांची आई श्रीमती फुलाबाई सिद्राम मस्के यांच्या नावावर दारिद्रयरेषेखालील पिवळे रेशनकार्ड आहे. तथापि अपीलकर्ता श्री.संभाजी सिद्राम मस्के हे विभक्त राहत असून ते एका पाक्षिकाचे पत्रकार आहेत त्यांच्याकडे एक मोटारसायकल व मोबाइल आहे तसेच त्यांच्या नावे घरजागा आहे. अपीलकर्त श्री.मस्के हे आई पासून विभक्त राहत असल्याने ते दारिद्रयरंषेखालील कार्डधारक होऊ शकत नाही, असे नमूद केले आहे. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी आयोगास सादर केलेला अहवाल लक्षात घेता श्री.मस्के यांची अपिले दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील दोन्ही अपिले अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संभाजी सिद्राम मस्के
घर नं.३७, राजीव गांधी नगर, भवानी पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक,**
उमाबाई श्राविका हायस्कूल,
बुधवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७/०८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७/०९/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/१०/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उमाबाई श्राविका विद्यालय, सोलापूर च्या व्यवस्थापन मंडळावरील पदाधिका-यांचा तपशिल, अनुदानित तुकडया, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवक संच, तदनुषिंग ८ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संभाजी सिद्राम मस्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत ते दारिद्रयरेषेखालील असलेबाबत नमूद केले असून पुरावा म्हणून शिधापत्रिकेची छायांकित प्रत सादर केली आहे. या सदंर्भात श्री. मस्के हे दारिद्रयरेषेखालील आहेत अथवा कसे, याबाबत शहानिशा करुन

अहवाल सादर करण्याबाबत आयोगाने दि.१५/१२/२००८ च्या पत्रान्वये निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांना निर्देशीत केले. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी याबाबत अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये श्री.संभाजी सिद्राम मस्के यांची आई श्रीमती फुलाबाई सिद्राम मस्के यांच्या नावावर दारिद्रयरेषेखालील पिवळे रेशनकार्ड आहे. तथापि अपीलकर्ता श्री.संभाजी सिद्राम मस्के हे विभक्त राहत असून ते एका पाक्षिकाचे पत्रकार आहेत.त्यांच्याकडे एक मोटारसायकल व मोबाईल आहे.तसेच त्यांच्या नावे घरजागा आहे. अपीलकर्ता श्री.मस्के हे आई पासून विभक्त राहत असल्याने ते दारिद्रयरेषेखालील कार्डधारक होऊ शकत नाही, असे नमूद केले आहे. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी आयोगास सादर केलेला अहवाल लक्षात घेता श्री.मस्के यांचे अपील दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 3 1 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संभाजी सिद्राम मस्के
घर नं.३७, राजीव गांधी नगर, भवानी पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
विमल कन्या प्रशाला,मुरारजी पेठ,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८९/सोलापूर +१२९०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७/०५/२००८, २/६/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०/०८/२००८, २०/८/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) विमल कन्या प्रशाला, सोलापूरच्या व्यवस्थापन मंडळावरील पदाधिका-यांचा तपशिल, अनुदानित तुकडया , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवक संच, तदनुषिंग ८ मुद्दे<br>२) प्रशालेतील इयत्ता ५वी ते १०वी मधील मागासवर्गीय मुलींना मिळणारी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, अपंगशिष्यवृत्ती, अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती व विडी कामगार शिष्यवृत्ती इ. बाबतची माहिती तसेच शाळेचे बँक आकौंउट स्टेटमेंट, रोस्टर, स्टाफ अप्रुव्हल, अनुषंगिक ६ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संभाजी सिद्राम मस्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत ते दारिद्रयरेषेखालील असलेबाबत नमूद केले असून पुरावा म्हणून शिधापत्रिकेची छायांकित प्रत सादर केली आहे. या सदंर्भात श्री. मस्के हे दारिद्रयरेषेखालील आहेत अथवा कसे, याबाबत शहानिशा करुन अहवाल सादर करण्याबाबत आयोगाने दि.१५/१२/२००८ च्या पत्रान्वये निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांना निर्देशीत केले. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी याबाबत अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये श्री.संभाजी सिद्राम मस्के यांची आई श्रीमती फुलाबाई सिद्राम मस्के यांच्या नावावर दारिद्रयरेषेखालील पिवळे रेशनकार्ड आहे. तथापि अपीलकर्ता श्री.संभाजी सिद्राम मस्के हे विभक्त राहत असून ते एका पाक्षिकाचे पत्रकार आहेत त्यांच्याकडे एक मोटारसायकल व मोबाइल आहे तसेच त्यांच्या नावे घरजागा आहे. अपीलकर्त श्री.मस्के हे आई पासून विभक्त राहत असल्याने ते दारिद्रयरंषेखालील कार्डधारक होऊ शकत नाही, असे नमूद केले आहे. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी आयोगास सादर केलेला अहवाल लक्षात घेता श्री.मस्के यांची अपिले दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील दोन्ही अपिले अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.किरण मुरलीधर घाडगे
तुळजाई औद्योगिक प्रशिक्षण संस्था मार्ग,
मु.पो.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक,**
उप जिल्हा रुग्णालय पंढरपूर, ता.पंढरपूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९३/सोलापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१/०९/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. सुजाता गुंडेवार यांच्या सोनोग्राफी केंद्र नोंदणीच्या संदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. किरण मुरलीधर घाडगे हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे विहित मुदतीत माहिती दिली

असल्याचे जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी डॉ.जे.के.वायदंडे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सिद्राम माणिकराव गडमिरे
व्दारा श्री.आर.आर.गडमिरे
१०४, पश्चिम मंगळवार पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, पहिला मजला,
सदर बझार सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
शिवगंगा नवरात्र महोत्सव मंडळ,
४३,१/२, मराठा वस्ती, भवानी पेठ,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९६/सोलापूर + १२९७/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०६/२००८, ३/०७/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १/०९/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) श्री.सी.एम.बिराजदार विश्वस्त, शिवगंगा नवरात्र महोत्सव तरुण मंडळ, सोलापूर यांच्या नावावर जागेच्या खरेदीखत/अभिहस्तांतरणाच्या अनुषंगाने एकूण १६ मुद्दे<br>२) शिवगंगा नवरात्र महोत्सव तरुण मंडळाच्या स्थापनेपासून दानपेटी, भक्तांनी दिलेल्या साडयांची विक्री व भक्तांनी अर्पण केलेल्या सोने, चांदी व त्यापासून बनविलेल्या दागिन्यांची माहिती | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. सिद्राम माणिकराव गडमिरे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या दि. १/०९/२००८रोजीच्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) दोन्ही अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

२) श्री. सिद्राम माणिकराव गडमिरे यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि. १/०९/२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राजेंद्र बनसिध्दप्पा गायकवाड
ब्लॉक क्र.एम.१६, सुंदरमनगर,
विजापूर रोड, सोलापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०१/सोलापूर+१३०२/सोलापूर+१३०३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०६/२००८, |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/०८/२००८, |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) अपीलकर्ता श्री. राजेंद्र बनसिध्दप्पा गायकवाड यांच्या विभागीय चौकशीच्या संदर्भातील माहिती<br>२) विभागीय चौकशीच्या संदर्भातील खुलासेवजा माहिती व विभागीय चौकशीशी संबधीत कागदपत्रांच्या सत्यप्रती<br>३) जिल्हा परिषदेच्या सेवेत अनधिकृत गैरहजर राहून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम ३ चा भंग केल्याच्या आरोपाच्या पृष्टयर्थ कागदपत्रांच्या नकला | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. राजेंद्र बनसिध्दप्पा

गायकवाड यांच्या विभागीय चौकशीच्या संदर्भातील त्यांच्या माहिती - मागणी अर्जानुसार त्यांना उपलब्ध सर्व कागदपत्रे देण्यात आली असल्याचे अपिलांसोबतच्या कागदपत्रांवरुन दिसून येते. विभागीय चौकशीचा अहवाल खरा/खोटा, त्याबाबतचा अभिप्राय, खुलासा ही बाब माहितीचा अधिकार अधिनयम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय वामन चव्हाण
मु. पो.बोरीपार्धी, ता. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी पुणे यांचे चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी पुणे यांचे चिटणीस,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. संजीव वा. देशमुख | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. विजय वामन चव्हाण यांनी मागितलेली माहिती त्यांनी शुल्क भरल्याच्या दिवशीच दिली. आणखी काही स्पष्टीकरणात्मक माहिती मिळण्याची मागणी त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त केली. त्यानुसार सर्व संबंधित संचिका त्यांना दाखविल्या. बिअरबार परवाना नाकारण्याशी संबंधित त्यांचा प्रमुख विषय असून मूळ कागदपत्रानुसार आणखी काही माहिती हवी असल्यास दिली जाईल, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचे चिटणीस श्री. संजीव वा. देशमुख यांनी केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड,
सोलापूर जिल्हा शाखा,
रत्नदिप हौसिंग सोसायटीजवळ,
विकास नगर मागे, सिव्हील लाईन, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाथ प्राईड, १ला मजला,
सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**२) श्री.अंगद केशव पांचाळ (मूळ अर्जदार)**
१६९, चित्रकुट बिल्डींग ज्ञानेश्वर नगर, जुळे सोलापूर,
सी.टी.बस स्टॉप शेजारी, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१९/सोलापूर + १३२०/सोलापूर |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३/१०/२००८ |
| ३ | **मूळ अर्जदाराने माहिती-मागणी अर्जान्वये केलेली मागणी :-** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड, सोलापूर जिल्हा शाखा या संस्थेला देणग्या देणा-या व्यक्तींची नावे, पत्ते, देणगी रक्कम व संस्थेने कर्मचा-यांना दिलेल्या ॲडव्हान्स रक्कमेची माहिती | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे मूळ अर्जदार श्री. अंगद केशव पांचाळ यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या दि. २३/१०/२००८ रोजीच्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) दोन्ही अपिले मान्य करण्यात येत आहेत.

२) मूळ अर्जदार श्री. अंगद केशव पांचाळ यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि. २३/१०/२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३/३, एलआयजी, सिंधूनगर, सेक्टर-२५, निगडी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३/३, एलआयजी, सिंधूनगर, सेक्टर-२५, निगडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.डी.एन.जोशी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.६.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.६.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.७.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.७.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नवनगर विकास प्राधिकरणाने दिलेल्या निवासी गाळ्याबाबत आपण केलेल्या तक्रारीनुसार अतिक्रमणाबाबत कारवाई केली नाही. मूळ गाळाधारक वेगळे असून प्रत्यक्षात माहितीच्या अधिकारात दिलेली नावे वेगळ्या व्यक्तींची आहेत. नियमानुसार गाळा भाडेपट्ट्याने देता येत नसताना अनेक जण तेथे राहतात. याबाबतची माहिती आपण स्वत: संकलित करून दिली व ऊर्वरित माहिती मागितली. परंतु अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिलीप दिगंबर नवगिरे यांनी केली.

गाळा वाटप व अतिक्रमण या संदर्भातील माहिती श्री.नवगिरे यांना दिली. मात्र मूळ वाटप व नंतर त्यात झालेले बदल याबाबत त्यांचे आक्षेप असून काही गाळाधारकांनी अतिक्रमण केल्याची त्यांची तक्रार आहे व त्याबाबत खुलासा, अन्वयार्थ अशा स्वरूपाची माहिती-मागणी त्यांनी केली आहे. माहिती देण्यात आली आहे, परंतु आपल्या तक्रारीनुसार कारवाई करावी, अशी श्री.नवगिरे यांची मुख्य मागणी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहा.नगररचनाकार, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.डी.एन.जोशी यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. अतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास तीही देण्याची तयारी असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यांची प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. .३.२०१०**